# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
# ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
# सभावृत्तांत
# कार्यपत्रिका क्र. ४

दिनांक :- १८/०६/२०१४ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १८/०६/२०१४ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ओव्हाळ शेखर अशोक अध्यक्ष
२. मा. शमीम पठाण
३. मा. डोके अपर्णा निलेश
४. मा. गावडे जयश्री वसंत
५. मा. पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
६. मा. पवार यमुनाताई रमणनाना
७. मा. गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश
८. मा. कलाटे स्वाती मयूर

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. क्षेत्रीय अधिकारी सुभाष माछरे, मा. कार्यकारी अभियंता – रविंद्र दुधेकर, गोपाळ चिंचवडे, उपअभियंता,- के. डी. फुटाणे, सुधाकर कुदळे, एन. आर. निबाळकर, सी.बी.कोंडे व्ही.एन.देसले, सहा. आरोग्याधिकारी - जे.एस. जानकर, जी.एस. देशपांडे, उद्यान - डी. एम. आढळे, आर. बी. चांदेरे इत्यादी.

\- - - - - -

मा. अध्यक्ष – भाजपचे ज्येष्ठ नेते, केंद्रीय मंत्री मा. गोपीनाथजी मुंडे यांचे निधन झाल्याने त्यांस श्रध्दांजली अर्पण करणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

\- - - - - -

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष मा. ओव्हाळ शेखर अशोक यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

अ) दि. १५/०५/२०१४ (कार्यपत्रिका क्र.२) रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. अध्यक्ष यांनी प्रकट केले.

ब) दि. २१/०५/२०१४ (कार्यपत्रिका क्र.३) रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

**उपस्थित सन्मा सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र. ३ प्रभाग क्र. ५२ ताथवडे येथील काळाखडक येथे श्री. अनिल जाधव यांच्या घरासमोरील चंद्रमाऊली गार्डन आहे. त्या समोरील चौकाला **जाधव कॉर्नर** असे नामकरण करणेबाबत.

विषय क्र. ४ चिंचवडे फार्मच्या शेजारील वाल्हेकरवाडी रोड लगतची उत्तरेकडील कॉलनी स.न. ३२/२/ब, स.न. ३३/१ यांस **सिध्दीविनायक कॉलनी** संबोधणेबबत.

ठराव क्र. ६ विषय क्र. १
दि. १८/०६/२०१४ विभाग : सन्मा सदस्यांचा विषय
सुचक : मा. पवार यमुनाताई रमणनाना अनुमोदक: मा. शमीम पठाण
संदर्भ : मा. माया संतोष बारणे यांचे दि. १०/०५/२०१४ रोजीचे पत्र.

थेरगांव लक्ष्मणनगर येथील सब वे याचे नांमकरण **कै. नागुभाऊ गतिराम बारणे** असे करणेस व खालील प्रमाणे कॉलनीचे नांमकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

१. अजिंक्यतारा कॉलनी गुजरनगर थेरगांव
२. महादेव कॉलनी गुजरनगर थेरगांव
३. श्री महालक्ष्मी कॉलनी डांगे चौक थेरगांव
४. जय गणेश कॉलनी वाकड रोड थेरगांव

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ७ विषय क्र. २
दि. १८/०६/२०१४ विभाग : सन्मा सदस्यांचा विषय
सुचक : मा. पवार यमुनाताई रमणनाना अनुमोदक: मा. गावडे जयश्री वसंत
संदर्भ : मा. माया संतोष बारणे यांचे दि. १०/०५/२०१४ रोजीचे पत्र.

थेरगांव येथील सामाजिक कार्यकर्ते नागुभाऊ गतिराम बारणे यांनी सन १९८९ साली महानगरपालिकेला शाळा बांधण्यासाठी दहा गुंठे जागा विना मोबदला दिली होती. मागील वर्षी दिनांक २५/०६/२०१३ मध्ये त्यांचे निधन झाले. शाळेच्या परिसरामध्ये त्यांचे स्मरणार्थ अर्ध पुतळा बसविणेबाबतचा संपुर्ण खर्च तसेच चौथऱ्याचा खर्च बारणे कुंटुंब करण्यास तयार आहे. तरी सदर प्रस्ताव मा. शहर सुधारणा समितीमार्फत मा. सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेकामी पाठविणेस शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ८ विषय क्र. ३
दि. १८/०६/२०१४ विभाग : सन्मा सदस्यांचा विषय
सुचक : मा. पवार यमुनाताई रमणनाना अनुमोदक: मा. शमीम पठाण
संदर्भ : मा. ओव्हाळ शेखर अशोक यांचे दि. १८/०६/२०१४ रोजीचे पत्र.

प्रभाग क्र. ५२ ताथवडे येथील काळाखडक येथे श्री. अनिल जाधव यांच्या घरासमोरील चंद्रमाऊली गार्डन आहे. त्या समोरील चौकाला **जाधव कॉर्नर** असे नामकरण करणेस व सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ९
दि. १८/०६/२०१४
सुचक : मा. गावडे जयश्री वसंत

विषय क्र. ४
विभाग : सन्मा सदस्यांचा विषय
अनुमोदक : मा. डोके अपर्णा निलेश

संदर्भ : सन्मा. नगरसदस्य यांचे दि. १८/०६/२०१४ रोजीचे पत्र.

चिंचवडे फार्मच्या शेजारील वाल्हेकरवाडी रोड लगतची उत्तरेकडील कॉलनी स. न. ३२/२/ब, स.न. ३३/१ यांस **सिध्दीविनायक कॉलनी** असे संबोधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. सभाध्यक्षा मा. शमीम पठाण यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ ओव्हाळ शेखर अशोक ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बप्र/२/कावि/ /२०१४.
दिनांक : / /२०१४

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत
सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.